**कृपया प्रसिध्दीसाठी** **17 एप्रिल 2009**

## राम नाईक शतायुषी व्हावेत म्हणून
## 101 सुवासिनींनी केले औक्षण

**मुंबई, शुक्रवार:** भाजपा-शिवसेना युतीचे उत्तर मुंबईतील उमेदवार श्री. राम नाईक यांची काल बोरीवली येथील प्रचार फेरीत आजवरच्या सर्व प्रचार फे-यांपेक्षा आगळीवेगळी ठरली. जल्लोष, गर्दी, उत्साह यांचे उधाण असलेल्या प्रचार फे-या अनेकांनी पाहिल्या असतील. पण कालच्या फेरीत रंगत भरली ती एक्सर गावठाणातील 101 सुवासिनींनी श्री. राम नाईक यांना शतायुषी व्हा अशा शुभेच्छा देत औक्षण केले तेव्हा. असे औक्षण करण्याचे कारणही तसे खास होते. श्री. राम नाईक यांचा जन्म दिवस असल्याचे माहित असल्यामुळे उत्साहाने या सर्व सुवासिनी औक्षण करण्यासाठी आल्या होत्या.

1978 पासून बोरीवली मतदार संघाने श्री. राम नाईक यांची साथ दिली आहे. अगदी गेल्या पराभवाच्या वेळीही बोरीवली विधानसभेतील मतदारांनी तीस हजाराहून अधिक मतांचे मताधिक्य दिले होते. सहाजिकच यावेळी सर्वाधिक मताधिक्याने श्री. राम नाईक यांना निवडून देण्याचा जणू पणच बोरीवलीतील मतदारांनीही केला आहे. त्यामुळे जागोजागी बोरीवलीत प्रचाराच्या वेळी नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद श्री. राम नाईक यांना मिळत आहे. या उत्स्फुर्त प्रतिसादामुळे उत्साहात आलेले कार्यकर्ते आणि स्वतः श्री. राम नाईकही काल प्रचार फेरी एक्सरला पोहचली तेव्हा मात्र अक्षरशः भावूक झाले. प्रचंड संख्येने सणासुदीला आल्यासारख्या तबक-निरांजन घेवून सुवासिनी श्री. राम नाईक यांची वाटच बघत होत्या. या सर्व सुवासिनी होत्या आगरी समाजाच्या. श्री. राम नाईक यांनी मच्छिमारांसाठी केलेल्या कामामुळे ‘मच्छिमार मित्र’ अशीच नाईक यांची मच्छिमारांमध्ये प्रतिमा आहे. त्यामुळे एरवीही श्री. राम नाईक यांचे इथे जोरदार स्वागत झाले असते. परंतु श्री.राम नाईक यांचा काल वाढदिवस असल्यामुळे ते शतायुषी व्हावेत असे अभिष्टचिंतन करण्यासाठी एकत्रित 101 सुवासिनी तिथे आतुरतेने वाट बघत होत्या. त्यांनी केलेल्या औक्षणामुळे सारेच भारावून गेले.

त्या अगोदर ही प्रचार फेरी बाभई , लोकमान्य टिळक रस्ता, अशोक नगर, जयराज नगर, योगी नगर, विजय नगर, मस्जिद मेन रोड, रॉयल कॉम्प्लेक्स, चंदावरकर रस्ता मार्गे आली होती. इथल्या औक्षणा नंतर पुढे बाभईनाका, आचार्य नरेंद्र देव विद्यालय परीसरामध्येही श्री. नाईक यांनी आपला प्रचार केला. आमदार श्री. गोपाळ शेट्टी यांच्या पुढाकाराने आणि श्री. राम नाईक यांच्या कार्याध्यक्षतेखाली निर्माण झालेल्या सावरकर उद्यानाशीही या प्रचार फेरीचे वेगळेच स्वागत झाले. उद्यानातील दादा-दादी पार्कचे सदस्य असलेल्या शेकडो ज्येष्ठ नागरिकांनीही श्री. नाईक यांचे अभिष्टचिंतन केले. बोरीवलीकरांच्या विकासासाठी श्री. राम नाईक शतायुषी व्हावेत अशा शुभेच्छांचा सर्वत्र वर्षाव होत एका वेगळयाच उत्साहात काल श्री. राम नाईक यांचा प्रचार बोरीवलीत संपन्न झाला.

मतदारांना धन्यवाद देत श्री. राम नाईक यावेळी म्हणाले," मतदारांच्या प्रेमाचे उतराई होणे शक्य नाही. तरीही जनसेवेचे व्रत अविरत चालू ठेवून मी या प्रेमाची पावती देईन."

**(विनोद शेलार)**
**प्रसिद्धी प्रमुख**
**भ्रमणध्वनी 9867689540**